सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५१५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.२९० दि.१८/०८/२०२२ अन्वये विधान परिषद, उपसभापती मा.डॉ.निलमताई गोऱ्हे यांच्या विधान परिषद आमदार निधीतून रुग्णवाहिका खरेदी करणेसाठी र.रु.२२ लाख रुपये मंजूर असलेने व सदर रुग्णवाहिकेचा वापर नागरीकांना रुग्णालयात पोहचविणे व रुग्णालयातून ने आण करणेसाठी तसेच गरीब व गरजू रुग्णांना होणार असलेने सदरची रुग्णवाहिका खरेदी करणेस व सदरची रुग्णवाहिका गितांजली सेवाभावी संस्थेस कायमस्वरुपी ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत आलेली होती.

तथापि, सदर खरेदी करणेची रुग्णवाहिका ही अत्याधुनिक पद्धतीने सर्व सोईसुविधानीयुक्त अशी खरेदी करणेचा निर्णय झालेला असलेने व त्यासाठी र.रु.४५ लक्ष मात्र खर्च अपेक्षित असून, सदर रुग्णवाहिका देखभाल दुरुस्ती,चालक पगार,इंधन खर्च वाहन विमा इ.खर्चही सदर संस्था करणार असून, सदर रुग्णवाहिकेचा कोणताही अपघात झालेस त्याची जबाबदारी सदर संस्थेची राहणार आहे. सदर रुग्णवाहिकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरीब व गरजू रुग्णांना लाभा होईल यांची दक्षता सदर संस्थेने घेणेची आहे.

सबब, सदरची अत्याधुनिक सोईसुविधानीयुक्त रुग्णवाहिका खेरदी करणेस व सदरची रुग्णवाहिका गितांजली सेवाभावी संस्थेने मागणी केलेनुसार कायमस्वरुपी ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेस देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संजय मेंढे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५१६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.मनोज रघुनाथ सरगर यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.२५१ दि.२०/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२२/प्र.क्र.९८(४२)/न.वि.-१६ मंत्रालय मुंबई दि.३० मार्च २०२२ रोजीचे शासन निर्णयान्वये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास या योजनेंतर्गत र.रु.५ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. सदर निधीमधून शासन निर्णयातील नमुद शर्ती-अटीस अधीन राहून त्यामधील नमुद एकूण २२ कामांकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे पाठविणेस व शासन निर्णयातील अट क्र.०२ नुसार सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असलेने, त्यानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करणेस मान्यता देणेत आलेली होती.

दरम्यान शासन निर्णय क्र.संकिण-२०२२/प्र.क्र.१८३/नवि १६ दि.०६ जुलै २०२२ अन्वये ज्या कामांचा कार्यारंभ आदेश देणेत आलेला नाही अशा कामांना स्थगिती देणेत आलेली होती. त्यानुसार सदरची कामांची पुढील कार्यवाही झालेली नव्हती. आता शासन निर्णय क्र.-मनपा-२०२२/प्र.क्र.९८(४२)/ नवि १६ दि.२५ एप्रिल २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरची स्थगिती उठविणेत आलेली असून, दि.३० मार्च २०२२ च्या शासन निर्णयातील मंजुर २२ कामापैकी १० कामे रद्द करणेत आलेली असून नव्याने १० कामांना मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार खालील २२ कामांकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम रुपये
१	सांगली वॉर्ड क्र.१० ब मधील भीमनगर झोपडपट्टी मधील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण व पि.सी.सी. गटारी करणे.	२५०००००
२	मिरज प्र.क्र.३ येथील विश्वश्री चोक येथे वाचनालय बांधकाम करणे	२५०००००
३	मिरज प्र.क्र.३ मधील साई गणेश कॉलनी येथील खुला भूखंड विकसीत करणे	३४०००००
४	सांगली वॉर्ड क्र.१० ब मधील वडर कॉलनी येथील ठीक ठिकाणी पि.सी.सी. गटारी व काँक्रीटीकरण करणे.	२५०००००
५	सांगली वॉर्ड क्र.१० ब मधील माळी गल्ली येथील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे	२५०००००
६	मिरज प्र.क्र.४ मधील जिलेबी चौक येथे सखदेव बोळ येथील ड्रेनेज लाईन व रस्ता करणे	२५०००००
७	सांगली वॉर्ड क्र.११ मधील संजयनगर परिसरातील ठिक ठिकाणी पि.सी.सी.गटर करणे	२४०००००
८	सांगली वॉर्ड क्र.११ मधील संजयनगर परिसरातील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे	२००००००

९	सांगली वॉर्ड क्र.११ मधील संजयनगर दडगे प्लॉट परिसरातील रस्त्यांची सुधारणा करणे.	२००००००
१०	मिरज प्र.क्र.३ मधील मालगाव रोड पवन चक्कीजवळी सावंत प्लॉट येथील ड्रेनेज लाईन रस्ता करणे	२५०००००
११	सांगली वॉर्ड क्र.११ मधील बिरनाळे हायसकुल आय.टी.आय.पर्यंत गटर करणे	२२०००००
१२	सांगली वॉर्ड क्र.११ मधील संजयनगर येथील मंगलमुर्ती कॉलनी सेथील रस्त्यांची सुधारणा करणे.	२००००००
१३	मिरज प्र.क्र.५ मप्रील बरेलवाड रोड येथील स्वामी समर्थ पार्क मधील रस्ते करणे.	२५०००००
१४	मिरज प्र.क्र.७ मधील शनिवार पेठ येथील सतारमेकर गल्ली व मिरजकर बोळ व श्री अंबाबाई मंदिर समोरील रस्ता सुधारणा करणे	२५०००००
१५	सांगली वॉ.क्र.११ मधील राजनगर येथील आर.सी.सी.नाला करणे.	२५०००००
१६	मिरज प्र.क्र.७ माधील राजनगर येथील आर.सी.सी. नाला करणे.	२००००००
१७	सांगली वॉर्ड क्र.११ माधील बी.एस.एन.एल.गोडाऊन ते आय.टी.आय.कंपाऊंड रस्ता सुधारणा करणे	२००००००
१८	मिरज प्र.क्र.७ मधील गंगानगर येथे भत्तेजी निवास बांधणे	२५०००००
१९	सांगली महानगरपालिका क्षेत्रातील वॉड क्र.१८ मधील रामकृष्ण परमहंस सोसायटी पश्चिम बाजु कडील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	२४०००००
२०	मिरज प्र.क्र.२० मधील संघर्ष कॉलनी येथील रस्ते करणे.	२००००००
२१	सांगली वॉर्ड क्र.१४ मधील अंतर्गत बोळ रस्ते काँक्रीटीकरण करणे.	१००००००
२२	सांगली महानगरपालिका क्षेत्रातील वॉड क्र.१८ मधील धामणी जकात नाका शेजारी मनपा क्षेत्रात रस्ते डांबरीकरण व गटर व्यवस्था करणे.	१६०००००

सूचक :- मनोज रघुनाथ सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सौ. वर्षा निंबाळकर.

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५१७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली शहरामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणेकामी जागा निश्चिती करणेसाठी प्रथम स्थळ पहाणी करुन जागेची निश्चिती करुन पुतळा उभारणेसाठी व समिती गठीत करणेसाठी प्रस्ताव सादर करणेस महासभा ठराव क्र.२०६ दि.१८/०४/२०२२ अन्वये आदेशित करणेत आलेले होते. तथापि, प्रशासनाकडून याबाबतचा प्रस्ताव सादर झालेला नसल्याने, छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणेसाठी सांगली शहरातील टीपी स्किम नं.३ फायनल प्लॉट नं.९१ सिटी सर्व्हे नं.१०८४, १०८५ पै. ही जागा निश्चित करणेत येत असून, सदर पुतळा उभा करणेस समिती गठीत करणेत येवून, त्याकामी महाराष्ट्र शासन समान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.३१०२/८८४/ प्र.क्र.१२२/२०१२/२९ दि.०२ फेब्रुवारी २००५ च्या मार्गदर्शक सूचनानुसार आवश्यकत्या परवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्र घेवून, छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. धिरज सुर्यवंशी

अनुमोदक :- सौ. भारती दिगडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका